# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मि.भा.मनपा/~~आयुक्त~~ सचिव/996/2022-23
दि. 28/ 11 /2022.

वाचा - 1) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ2020/ प्र.क्र.79/नवि-14, दि. 26 ऑगस्ट 2022.
2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण 5.

**आदेश**

ज्याअर्थी, विद्यमान मिरा भाईंदर महानगरपालिकेची मुदत दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी संपुष्टात आली असल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी शासन आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.79/नवि-14, दि. 26 ऑगस्ट 2022 अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी तसेच विशेषतः कलम 452(अ) मधील तरतूदीनुसार निम्नस्वाक्षरीत यांची "प्रशासक" म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच महानगरपालिकेची विहीत मुदत संपताच प्रशासक म्हणून कार्यभार स्वीकारून अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील संदर्भ क्र. 1 वरील शासन आदेश दि. 26 ऑगस्ट 2022 नुसार निम्नस्वाक्षरीत यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या "प्रशासक" पदाचा कार्यभार दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी स्वीकारला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची "ड" प्रकरण 5 मधील परिच्छेद 2 मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"महानगरपालिकेची सामान्य मुद्रा नगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहीजे आणि ती ज्या संविदेवर किंवा अन्य लेख्यावर [स्थावर मालमत्तेच्या किंवा तीमधील हितसंबंधाच्या किंवा तिच्याबाबतच्या हक्कांच्या संपादनाशी संबंधित असलेल्या संविदेव्यतिरिक्त] लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर [स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा, महानगरपालिका उपआयुक्ताचा दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्या मधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या] उपस्थितीत लावण्यात आली पाहीजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखांवर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून [उक्त दोन व्यक्तींनी] त्यावर सहया केल्या पाहीजेत. [उक्त व्यक्तींच्या] सहया या, अशी कोणतीही संविदा किंवा लेख केल्याबद्दल कोणत्याही साक्षीदाराने केलेल्या सहयांपासून वेगळ्या असल्या पाहीजेत"

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची "ड" प्रकरण 5 मधील परिच्छेद 2 नुसार, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक संविदेवर व लेख्यांवर स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेची सामान्य मुद्रा लावण्यात येत होती व

याचे दर्शक म्हणून सदर दोन सदस्यांच्या त्यावर स्वाक्षऱ्या करण्यात येत होत्या. तथापि मिरा भाईंदर महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी संपष्टात आली आहे व तद्अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदस्यांची व पर्यायाने स्थायी समितीची विहीत मुदतही संपुष्टात आली आहे. त्यामुळे, अशा संविदेवर दर्शक म्हणून स्वाक्षरी करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची "ड" प्रकरण 5 मधील परिच्छेद 2 मध्ये नमूद केल्यानुसार, आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल, असा महानगरपालिका उपआयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी दिलीप ढोले, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रशासक तथा आयुक्त म्हणून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारात, मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या संविदेवर व लेख्यांवर दर्शक म्हणून स्वाक्षरी करणेकरीता खालील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करीत आहे.

1) अतिरिक्त आयुक्त (1) व (2), मिरा भाईंदर महानगरपालिका
2) शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका
3) उपआयुक्त (मुख्यालय), मिरा भाईंदर महानगरपालिका

सदर अधिकाऱ्यांपैंकी कार्यालयात उपस्थित असलेल्या कोणत्याही दोन अधिकाऱ्यांनी संविदेवर व लेख्यांवर दर्शक म्हणून स्वाक्षरी करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव रवाना

1. अतिरिक्त आयुक्त, (1) व (2), मिरा भाईंदर महानगरपालिका.
2. शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका
3. सर्व उपायुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
2. मुख्य लेखाअधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका
3. मुख्य लेखापरिक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिका
4. महापालिका सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका
5 सर्व विभाग प्रमुख.
6. आदेश नस्ती